**ठळक बातम्या**

- दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून रेखा गुप्ता यांनी घेतली शपथ
- ९व्या आशिया आर्थिक संवाद कार्यक्रमाला आजपासून पुण्यात सुरुवात
- देशात वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या अपघातात अकरा जणांचा मृत्यू
- रशिया-युक्रेन युद्धासाठी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की हेच जबाबदार असल्याची डोनाल्ड ट्रम्प यांची टीका

**आणि**

- नवव्या आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत न्यूझिलंडची पाकिस्तानवर मात, दुबईत आज भारत आणि बांगलादेश यांच्यात लढत

**<><><><><>**

भारतीय जनता पक्षाच्या दिल्लीच्या नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी आज रामलीला मैदानावर पार पडला. भाजपा नेत्या रेखा गुप्ता यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. दिल्लीचे नायब राज्यपाल वी.के. सक्सेना यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. त्यांच्याबरोबर ६ कॅबिनेट मंत्र्यांनीही आज शपथ घेतली. यामध्ये परवेश साहिब सिंह वर्मा, आशीष सूद, मनजिन्दर सिंह सिरसा, रविंद्र इन्द्राज सिंह, कपिल मिश्रा आणि पंकज कुमार यांचा समावेश आहे. यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही यावेळी उपस्थित होते.

भाजपाने निवडणूक प्रचारात महिलांना दरमहा अडीच हजार रुपये देण्याचं आश्वासन दिलं होतं, त्याची पूर्तता ८ मार्चपासून करण्यात येणार असून दिल्लीतील महिलांच्या खात्यात पहिल्या हप्त्याचे पैसे जमा होण्यास सुरुवात होईल. असं रेखा गुप्ता यांनी शपथविधिच्या आधी वार्ताहरांना सांगितलं.  आमचं मंत्रिमंडळ आणि सर्व

आमदारांवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वप्न साकार करण्याची मोठी जबाबदारी आहे असंही त्या म्हणाल्या.

रामलीला मैदानावर झालेल्या या शपथविधी सोहळ्यासाठी दिल्लीत कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. २५ हजार पोलीस कर्मचारी आणि निमलष्करी दलाच्या १५ तुकड्या तैनात करण्यात आल्या होत्या. रामलीला मैदानात ५ हजार पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.

**<><><><><>**

अरुणाचल प्रदेश आणि मिझोरम राज्यांच्या स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. ही राज्ये सांस्कृतिक वारश्यानं समृद्ध असून तिथले नागरिक या अद्वितीय नैसर्गिक आणि सांस्कृतिक वारश्याचं अभिमानानं जतन करतील, असं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. दोन्ही राज्यातले लोक प्रगतीचा आणि उत्कृष्टतेचा नवा अध्याय लिहितील, असंही राष्ट्रपती म्हणाल्या.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनीही अरुणाचल आणि मिझोरम मधल्या नागरिकांना राज्य स्थापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. नैसर्गिक सौंदर्य आणि सांस्कृतिक वैविध्यानं नटलेल्या या राज्यांनी भारताच्या वाढीत महत्त्वाचं योगदान दिल्याचं शहा यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी आज देशातील वैमानिकांसाठीच्या इलेक्ट्रॉनिक व्यक्तीगत परवाना म्हणजेच ईपीएल प्रणालीचं उद्घघाटन केलं. या नव्या परवाना पद्धतीमुळे वैमानिकांना परवाना मिळवणं आणि त्याचं नुतनीकरण करणं अधिक सुलभ होणार आहे. इलेक्ट्रॉनिक लायसन्स देणारा भारत हा जगातला दुसरा देश ठरला आहे, असंही नायडू यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

९व्या आशिया आर्थिक संवाद कार्यक्रमाचं आजपासून तीन दिवस पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. आशिया आर्थिक संवाद हा परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचा वार्षिक उपक्रम असून भू-अर्थशास्त्राबाबत विविध मुद्यांवर यात विचारविनिमय होणार आहे. परराष्ट्र मंत्रालय आणि पुणे आंतरराष्ट्रीय केंद्राच्या सहयोगानं हा कार्यक्रम होणार आहे.

या कार्यक्रमात भारत आणि जगभरातले राजकीय नेते, वरिष्ठ सनदी अधिकारी, धोरण कर्ते, उद्योग तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ सहभागी होणार आहेत, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं आहे. २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान हा कार्यक्रम होणार आहे. फ्रॅगमेंटशन युगातली आर्थिक लवचिकता आणि पुरुत्थान ही यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना आहे.

**<><><><><>**

भारत आणि अर्जेंटिना यांच्यात काल लिथियम उत्खनन आणि खाणकाम संदर्भात सहकार्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. कोळसा आणि खाण मंत्री जी किशन रेड्डी आणि कॅटामार्काचे राज्यपाल राऊल अलेजांद्रो जीलील यांच्यादरम्यान झालेल्या बैठकीत हा करार करण्यात आला. लिथियम उत्खनन आणि त्यातील गुंतवणूक संधींमध्ये सहकार्य वाढवण्यावर चर्चा झाली. दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय भागीदारी सुनिश्चित करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धोरणात्मक मुद्यांवर चर्चा केली. तसंच अर्जेंटिनाच्या खाण क्षेत्रात भारताचा सहभाग वाढवण्यासाठी ज्ञानाची देवाणघेवाण तसंच पायाभूत सुविधांच्या पुरवठ्यावर भर देण्यात आला. या सहकार्य करारामुळे लिथियम उत्खनन प्रकल्पांना गती मिळेल, तसंच संसाधन सुरक्षा वृद्धी होऊन भारतीय कंपन्यांसाठी नव्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

बांगलादेश एअर लाईन्सच्या ढाक्याहून दुबईला जाणाऱ्या विमानाला काल रात्री तांत्रिक अडचणींमुळे आपात्कालीन परिस्थितीत नागपूर विमानतळावर उतरावं लागलं, अशी माहिती विमानतळावरच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानं दिली आहे. या विमानातून ३९६ प्रवासी आणि १२ विमान कर्मचारी प्रवास करत होते. आज या सर्वांना दुसऱ्या विमानानं दुबईला पाठवलं जाणार आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशातल्या जौनपूर इथं काल रात्री उशीरा झालेल्या दोन वेगवेगळ्या अपघातात आठ भाविकांचा मृत्यू झाला असून ३२ जण जखमी झाले आहेत.

पहिल्या अपघातात बदलापूर भागात सुल्तानपूर रस्त्यावर भाविकांना घेऊन जाणाऱ्या चारचाकीला अज्ञात वाहनानं धडक दिल्यानं पाच जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण जखमी झाले. मृतांमधे तीन महिला आणि एका बालकाचा समावेश आहे. हे भाविक अयोध्येला जात होते.

दुसऱ्या अपघातात डबल डेकर बसची ट्रकला धडक झाल्याने तीन जणांचा मृत्यू झाला, तर २७ जण जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

मध्य प्रदेशातल्या भिंड इथं आज सकाळी दोन वाहनांची धडक होऊन झालेल्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला आहे, तर दोन जण जखमी झाले. मृत प्रवासी एका लग्नसोहळ्यासाठी जात होते. या प्रकरणाचा तपास सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

मणिपूरमधल्या  चुराचंदपूर, थौबल आणि इम्फाळ पूर्व जिल्ह्यातून दोन वेगवेगळ्या संघटनाच्या चार दहशतवाद्यांना पोलिसांनी अटक केली आहे. यातला

एक जण युनायटेड कुकी नॅशनल आर्मीचा सदस्य आहे, तर बाकीचे तिघं कांगलीपाक कम्युनिस्ट पार्टीचे सदस्य असल्याचं पोलिसांनी सांगितलं. पोलिसांनी मागच्या दोन दिवसांत शस्त्रास्त्र आणि दारूगोळा जप्त केला आहे.

**<><><><><>**

निसार अर्थात नासा-इस्रो सिंथेटिक अपर्चर रडार या अभियानाच्या माध्यमातून जर अंतराळविषयक मोहिमांच्या कामाचा आणि खर्चाचा वाटा विभागला तर खर्चाचं प्रमाण अमेरिकेच्या तुलनेत पाचपटीनं कमी होईल, असं प्रतिपादन इस्रोचे माजी अध्यक्ष एस. सोमनाथ यांनी काल केलं. अहमदाबाद मॅनेजमेंट असोसिएशनतर्फे आयोजित इंडिया टुमॉरो अनलॉकिंग इंडस्ट्री, इनोव्हेशन, टॅलेंट या विषयावरच्या चर्चासत्रात ते बोलत होते.

निसार अभियानातून नासा आणि इस्रो या संस्था संपूर्ण जगाचा नकाशा तयार करतील. या नकाशातून पृथ्वीच्या परिसंस्थेतले बदल, पृथ्वीवरच्या बर्फाचं वस्तुमान, वनस्पतींची घनता, समुद्र पातळीतली वाढ, भूजल आणि नैसर्गिक धोके समजून घेण्यासाठी माहितीची नोंद करतील, असंही सोमनाथ यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

रशिया- युक्रेन युद्धासाठी राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की जबाबदार असून ते अत्यंत कमकुवत नेते असल्याची टीका अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. रशिया-युक्रेन युध्द संपवण्याच्या उद्देशानं वाटाघाटी घडवून आणण्यासाठी सध्या चर्चा सुरु आहे. या चर्चेतून युक्रेनला वगळण्यात आल्याबद्दल युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर झेलेन्सकी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी ही टीका केली आहे. झेलेन्स्की यांच्या उपस्थितीशिवाय देखील शांतता करार केला जाऊ शकतो, असं ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

तर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष चुकीच्या माहितीच्या आधारे बोलत असल्याचं वक्तव्य झेलेन्स्की यांनी कीव मधे पत्रकारांशी बोलताना केल्यानंतर दोन्ही नेत्यामधले संबंध ताणले गेले आहेत.

<><><><><>

नवव्या आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना बांग्लादेशाविरुद्ध होणार आहे. दुबईत होत असलेला हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी अडीच वाजता सुरु होईल.

कराची इथं काल झालेल्या पहिल्या सामन्यात न्यूझीलंडनं पाकिस्तानला ६० धावांनी हरवलं. न्यूझीलंडनं प्रथम फलंदाजी करताना ३२० धावा केल्या होत्या. तर प्रत्युत्तरादाखल पाकिस्तान सर्व गडी बाद २६० धावा करू शकला.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेच्या वतीनं आयोजित साखळी हॉकी सामन्यांमध्ये भारतीय पुरूष संघानं काल रात्री जागतिक विजेत्या जर्मनीवर १-० असा विजय मिळवत मंगळवारच्या पराभवाची परतफेड केली. भारताच्या गुरजंत सिंगने सामन्यातील एकमेव गोल केला. भारतीय संघाचा उद्या आर्यलंडशी सामना होणार आहे.

<><><><><>

भारतीय कृषी संशोधन परिषदेचा पूर्व क्षेत्र संशोधन परिसर, बिहारमधल्या पाटणा इथं आजपासून आपला रजत महोत्सव साजरा करत आहे. येत्या शनिवारी साजऱ्या केल्या जाणाऱ्या स्थापना दिन विशेष कार्यक्रमात, विशेष करून महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या एकीकृत शेती मॉडेलचं उद्घाटन होणार आहे. हे मॉडेल पोषणासंबंधी आवश्यकता पूर्ण करण्यासोबतच महिलांना वर्षभरासाठी उत्पन्नाचं साधन देखील उपलब्ध करून देईल, अशी माहिती या संस्थेच्या संचालकांनी दिली.